# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा / 5463

दिनांक :- ०४/११/२०२०

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० च्या वेळापत्रकाबाबत...**

**संदर्भ:- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा -६ /४४११/ दिनांक २०/१०/२०२०**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.नं. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | शुक्रवार दिनांक २०/११/२०२० ते शनिवार दिनांक ०५/१२/२०२० |
| २) | प्रात्यक्षिक्, श्रेणी व तोंडी परीक्षा | बुधवार दिनांक १८/११/२०२० ते शनिवार दिनांक ०५/१२/२०२० |
| ३) | तंत्र व पूर्व व्यावसायीक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ४) | नविन पूर्व व्यावसायीक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ५) | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ६) | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | सोमवार दिनांक ०७/१२/२०२० ते शनिवार दिनांक १२/१२/२०२० |

सदर परीक्षेसाठी खालील सुचनानुसार कार्यवाही करावी :-

१) विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने परीक्षा केंद्रावर लेखी परीक्षेच्या दिवशी घेण्यात येईल.

२) नियमित दिव्यांग विद्यार्थ्याच्या कार्यानुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दि.०७/१२/२०२० ते १२/१२/२०२० या कालावधीत संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावरून प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.

३) वर नमूद केलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य कार्यानुभवाचे विषय घेवून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाला असल्यास वरील निर्धारीत कालावधीतच सदर विषयांची परीक्षा आयोजित करावी.

४) विद्यार्थी संख्येनुसार शाळानी उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत दिनांक (१८/११/२०२० ते ०५/१२/२०२०) तोंडी परीक्षा/श्रेणी परीक्षा घेणे, संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ

याबाबतची माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच ठळक अक्षरात फळयावर दर्शनी भागावर सुचना लावण्यात यावी व विद्यार्थ्यांना अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

५) अंध, मुकबधिर, अपंग व बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा दि. १८/११/२०२० ते ०५/१२/२०२० या कालावधीतच आयोजित करण्यात याव्यात.

६) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा च्या प्रात्यक्षिक परीक्षेचे संबंधित विषयाची तोंडी परीक्षा व श्रेणी परीक्षा नमूद दिनांकासच आयोजन करावे. सदर परीक्षेचे वेळापत्रक संबंधित शाळांनी विभागीय मंडळाकडे परीक्षेपूर्वी पाठवावे. त्यानुसार सदर परीक्षा कालावधीत विभागीय मंडळाचे भरारी पथक शाळेना भेटी देतील.

७) परीक्षेचा कालावधी कमी असल्यामुळे यावेळी तोंडी व श्रेणी परीक्षा Out of Turn ने आयोजीत करण्यात येणार नाही. सदरची बाब सर्व माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून दयावी जेणेकरून कोणताही विदयार्थी परीक्षेपासून वंचीत राहणार नाही. याची नोंद घेवून विदयार्थ्यास सुचना देण्यात याव्यात.

**<u>प्रात्यक्षिक परीक्षेसाठी महत्वाची सुचना</u>**

नोंव्हेंबर-डिसेंबर २०२० विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा संबंधित केंद्रसंचालकांनी केंद्रावर विज्ञान विषयाच्या पेपरच्या दिवशी आयोजित करावी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेबाबत केंद्र संचालकांनी शाळा प्रमुखांना माहिती दयावी तसेच शाळा प्रमुखांनी सुध्दा केंद्र संचालकाशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेच्या निर्धारीत वेळेची माहिती घ्यावी व विद्यार्थ्यांना प्रवेश पत्र (Hall Ticket) देतेवेळी विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून त्याची स्वाक्षरी घ्यावी जेणेकरुन प्रात्यक्षिक परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही.

केंद्र संचालकांनी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी केंद्र शाळांनी मार्च २०२० परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या अंतर्गत व बहिस्त परीक्षकांची नियुक्ती करुन या परीक्षा केंद्र शाळेत आयोजित कराव्यात.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत,
केंद्रसंचालक नोंव्हेबर-डिसेंबर २०२० परीक्षा यांनी विज्ञान विषयाच्या लेखी परीक्षेच्या दिवशी सायन्स प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करण्यासाठी माहिती व पुढील कार्यवाहीस्तव